नियमित दिवाणी दावा २०२/२०२२

नि.क्र. ३६ सोबत

**वादीचा उलटतपास प्रतिवादीचे विधिज्ञ श्री. एस. पी. राउत यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

**१०.** मला लिहीता वाचता येत नाही. मी मराठीत सही करतो. मी वर्तमानपत्र वाचत नाही. मला हिशोब कळत नाही. मला चलनाच्या नोटा समजतात. मला विशिष्ट रक्कम दिली तर मी बाजारामध्ये जाउन हिशोब करुन सामान आणू शकतो. माझ्या जमीनीचे चारही कोपरे निश्चित करुन मिळण्यासाठी मी दावा दाखल केला आहे. माझ्या जमीनीचा गट क्र. ४७४ असा आहे. सदर गटामध्ये माझी २ एकर २२ गुंठे जमीन आहे. माझ्या जमीनीच्या पुर्वेला चांडगाव रस्ता, पश्चिमेला घोडेगाव रस्ता, उत्तरेला गट क्र. ४७४ मधील बोळगे यांची उर्वरीत जमीन व दक्षिणेला गट क्र. ४७४ मधील प्रतिवादी क्र.१ रामचंद्र जाणकू राउत याची जमीन आहे. घोडेगाव रस्त्याला लागून असलेल्या माझ्या जमीनीची रुंदी ७५ फुट एवढी आहे. चांडगाव रस्त्याला लागून असलेल्या माझ्या जमीनीची रुंदी ८० फुट एवढी आहे.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, मी व रामचंद्र सख्खे भाउ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ४७४ या जमीनीचा पुर्वीचा गट क्रमांक ८६८ असा होता. हे म्हणणे खरे आहे की, १९८९ साली गट क्र.८६८ या जमीनीला गट क्र.४७४ असा नवीन क्रमांक देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील जाणकू गणपत राउत यांच्या नावावर २ हेक्टर ५ आर एवढी जमीन होती. हे म्हणणे खरे आहे की, १९८२ साली माझ्या वडीलांनी माझ्यामध्ये व प्रतिवादी क्र.१ मध्ये जमीनीचे वाटप केले. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटपानूसार गटातील उत्तरेकडील वाटणी मला व दक्षिणेकडील वाटणी प्रतिवादी क्र.१ याला देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, मला वाटणीमध्ये १ हेक्टर २ आर जमीन मिळाली व प्रतिवादी क्र.१ याला १ हेक्टर ३ आर एवढी जमीन मिळाली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व प्रतिवादी क्र.१ मध्ये जमीनीचे वाटप झाल्यानंतर आमच्या दोघांच्या जमीनीमध्ये पुर्व–पश्चिम असा बांध टाकण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, आजही आमच्या दोघांच्या जमीनीमध्ये पुर्व–पश्चिम असा बांध आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर बांधावर पाच ते साडेपाच वर्षाचे सुबाभळाचे झाड तसेच लिंबाची झाडे व त्याची खोडे

आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जमीनीमध्ये मी लिंबोणीची झाडे लावली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांची फळबाग आम्ही लिंबोणीची झाडे लावण्याच्या अगोदरपासून आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या जमीनीतील लिंबोणीची झाडे आम्ही काढून टाकलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीच्या जमीनीतील फळबाग आजही तसीच कायम आहे. प्रतिवादी यांच्या जमीनीतील लिंबोणीची फळबाग १० ते ११ वर्षे जुनी आहे.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, वाटपानूसार मंजूर झालेल्या फेरफार क्रमांक १२१८ अन्वये माझ्या व प्रतिवादी क्र.१ याच्या नावाची नोंद ७/१२ च्या उता–यावर झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, २०१५ साली प्रतिवादी क्र.१ याने त्याच्या हिश्याची उत्तर बाजूची ७२ आर जमीन त्याचा मुलगा सचिन याला वाटणीमध्ये दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर ७२ आर जमीनीपैकी प्रतिवादी क्र. ५ सचिन याने पश्चिमेकडील घोडेगाव रस्त्याला लागून पश्चिम–उत्तर कोप–यातील ४ आर जमीन प्रतिवादी क्र. ६ उज्वला हिच्या नावावर केलेली आहे व त्यानूसार फेरफार क्रमांक ५६३१ हा मंजूर झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर ४ आर जमीन प्रतिवादी क्र. ६ हिला वस्तीपड म्हणून देण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर ४ आर क्षेत्रावर प्रतिवादी क्र.६ हिने घर बांधलेले असून त्या घराचा ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक १५५९ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.५ याला वाटणीमध्ये दिलेल्या वाटणीमध्ये लिंबोणीची बाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ याच्या नावे असलेले ३१ गुंठे क्षेत्र हे गट क्र. ४७४ मध्ये दक्षिण बाजूला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ याने त्याच्या नावे असलेल्या ३१ गुंठे क्षेत्रामध्ये पश्चिमेला घोडेगाव रस्त्यालगत घराचे बांधकाम केलेले आहे. त्या घराचा क्रमांक ५४० आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाच्या पत्नीचे नाव रुक्मीणी असे आहे. सदर घराच्या उता–यावर प्रतिवादी क्र.१ व त्याच्या पत्नीच्या नावाची नोंद आहे किंवा कसे हे मला माहित नाही. दावा दाखल करण्यापूर्वीपासून सदरचे घर आहे. त्या घराची माहिती मी माझ्या वकीलांना दिली होती. त्या घराचे उतारे मी काढले नव्हते.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी मला वाटणीमध्ये जे क्षेत्र दिले त्याची मी सुरवातीपासून वहिती करतो. हे म्हणणे खरे आहे की, त्याचप्रमाणे माझ्या भावाला वाटणीमध्ये दिलेल्या जमीनीची तो सुरवातीपासून वहिती करतो. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वहिवाटीमध्ये बदल झाला नाही. आमच्या जमीनीच्या गटाचा नकाशा मी पाहिलेला आहे. आता मला नि.२१ वरील गट क्र.४७४ या जमीनीचा नकाशा दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. २१ वरील नकाशानूसार गट क्रमांक ४७४ याच्या पुर्वेकडील बांध हा तिरकस गेलेला असल्याने सदर गटाला कोस निर्माण झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा कोस हा उत्तर बाजूला निर्माण झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सदर गटाच्या पुर्वेकडील व पश्चिमेकडील बांधामध्ये बदल झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानूसार माझ्या वाटणीमध्ये पूर्वेकडील बांध हा पश्चिमेकडील बांधाच्या तुलनेत रुंदीमध्ये जास्त आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानूसार प्रतिवादी क्र.१ च्या वाटणीमध्ये पश्चिमेकडील बांध हा पुर्वेकडील बांधाच्या तुलनेत रुंदीमध्ये जास्त आहे. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र याच्या वाटणीमध्ये सचिन व उज्वला हेदेखील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घोडेगाव रस्त्याला लागून जी पश्चिमेकडील जमीन आहे ती जास्त किंमतीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, पश्चिमेकडील घोडेगाव बाजूला लागून जी जमीन आहे ती मला व माझ्या भावाला सारख्या प्रमाणात मिळावी असे मला वाटते. हे म्हणणे खरे नाही की, तो बांध प्रतिवादी क्र.१ व ५ व ६ यांच्या वाटणीकडे सरकावा असे मला वाटते. हे म्हणणे खरे नाही की, तो बांध प्रतिवादी क्र. १, ५ व ६ यांच्या वाटणीकडे सरकावा म्हणून मी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

**१४.** प्रतिवादी क्र.१ याने माझा बांध कोरला तसेच त्याने मला त्रास दिला म्हणून मी त्याच्याविरुध्द आजअखेरपर्यंत पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिलेली नाही. तशी तक्रार मी प्रतिवादी क्र.५ व ६ यांच्याविरुध्दही दिलेली नाही. तशी वकीलामार्फत नोटीस मी प्रतिवादी क्र.१, ५ व ६ यांना दिलेली नाही किंवा त्यांच्याविरुध्द मनाईहुकूम मिळावा म्हणून मी त्यांच्याविरुध्द न्यायालयामध्ये दिवाणी दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१, ५ व ६ यांनी कधीही आमचा बांध कोरला नाही किंवा मला

त्रास दिलेला नाही, त्यामुळेच मी त्यांच्याविरुध्द पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिली नाही किंवा त्यांच्याविरुध्द मनाई हुकूमाचा दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादकथनाबरोबर दाखल करण्यात आलेल्या कच्च्या नकाशामध्ये प्रतिवादी क्र.१, ५ व ६ यांचे क्षेत्र कोठे आहे, हे दाखवण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर कच्च्या नकाशामध्ये प्रतिवादी क्र.३ व ४ यांची जमीन कोठे आहे, हे दाखवण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर कच्च्या नकाशामध्ये प्रतिवादी क्र.१ व त्याची पत्नी तसेच प्रतिवादी क्र.६ यांची घरे कोठे आहेत, हे दाखवण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वाटणीला आलेल्या जमीनीमध्ये माझे १५ वर्षांपूर्वीचे जुने घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वादकथनामध्ये तसेच कच्च्या नकाशामध्ये सदर घराचा उल्लेख नाही. दावा मिळकतीचा चालू ७/१२ उतारा मी पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर उता–यामध्ये प्रतिवादी क्र.६ हिच्या नावाचा उल्लेख उज्वला संतोष चाकणे असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.६ हिच्या नावाचा उल्लेख उज्वला संतोष चाकणे असा आम्ही केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अनेक वेळेस आम्ही आमचे क्षेत्र टेपने मोजले.

**प्रश्न–** जे काही मोजमाप झाले त्याप्रमाणे माझे व प्रतिवादी यांचे क्षेत्र उता–याप्रमाणे भरत आहे ?

**उत्तर –** ते मला मान्य नाही.

हे म्हणणे खरे नाही की, माझे क्षेत्र प्रतिवादी यांच्याकडे सराकवून त्यांचे क्षेत्र ताब्यात घ्यायचा असा माझा उद्देश आहे. हे म्हणणे खरे नाही की, पश्चिमेकडील बांध सारखा करण्यासाठी मी प्रस्तुतचा खोटा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या जमीनीमध्ये असलेले जुने बांध तसेच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने माझ्या जमीनीमध्ये कधी अतिक्रमण केले याचा उल्लेख दाव्यात नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने माझ्या जमीनीमध्ये अतिक्रमण केले व ते मला काढून मिळावे, अशी मागणी मी प्रस्तुत दाव्यामध्ये केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यामध्ये व प्रतिवादींमध्ये जमीनीच्या हद्दीवरुन वाद नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीमध्ये व प्रतिवादी

क्र.१ याच्या पत्नीमध्ये घरगुती वाद असल्यामुळे प्रतिवादींना त्रास देण्यासाठी मी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व प्रतिवादीमध्ये कौटूंबिक वाद आहेत. साक्षीदार पुढे स्वतःहून असे सांगतो की,सदर जमीनीवरुनच आमच्यामध्ये कौटूंबिक वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही**

श्रवणोत्तर स्वीकृती,

HAMIDKHA JANIKHA PATHAN
Digitally signed by HAMIDKHA JANIKHA PATHAN
Date: 2025.09.12 18:29:38 +0530

**(एच. जे. पठाण)**

ठिकाणः श्रीगोंदा

दिनांक १२/०९/२०२५.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, श्रीगोंदा.